गोमन्तक पणजी, शनिवार, १४ जून २०१४



# पर्यावरण सुरक्षेला प्राधान्य द्या : केरकर

## 'स्नायडर इलेक्ट्रिकल' पर्यावरण सुरक्षा सप्ताहाचा समारोप




**वेर्णा : येथे नुकत्याच आयोजित केलेल्या पर्यावरण सुरक्षा सप्ताह समारोप कार्यक्रमाला उपस्थित नगरसेवक सौ. तारा केरकर, डॉ. वल्लभ धायमोडकर, सुनील शेट, सर्व्हेश परब व इतर.**

कुठ्ठाळी, ता. १३ (वार्ताहर) : परिसर आणि पर्यावरण स्वच्छ ठेवण्यासाठी प्रत्येकाचा प्रयत्न असला पाहिजे. पर्यावरण सुरक्षित नसेल तर भविष्यात विपरीत परिणामांना सामोरे जावे लागणार आहे. त्यासाठी पर्यावरण सुरक्षेला प्राधान्य द्या, असे आवाहन मुरगावच्या नगरसेवक सौ. तारा केरकर यांनी केले.

स्नायडर इलेक्ट्रिकल कंपनीतर्फे आयोजित केलेल्या 'पर्यावरण सुरक्षा आठवडा' समारोप कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून बोलत त्या होत्या. यावेळी सन्माननीय पाहुणे म्हणून डॉ. वल्लभ धायमोडकर, पत्रकार सुनील शेट, कंपनीचे व्यवस्थापक सर्वेश परब, प्लांटचे प्रमुख सरावणा जनार्दन उपस्थित होते.

केरकर म्हणाल्या, वेर्णा येथील स्नायडर इलेक्ट्रिकल कंपनीचा पर्यावरण सुरक्षा आठवडा कार्यक्रमाचा उपक्रम स्तुत्य आहे. पर्यावरण संरक्षण व जतन काळाची गरज आहे. पर्यावरणाच्या सुरक्षेसाठी प्रत्येकाने वृक्ष संवर्धन करणे गरजेचे आहे, असेही त्या म्हणाल्या.

यावेळी डॉ. धायमोडकर व सुनील शेट यांचीही समयोचित भाषणे झाली. संपूर्ण आठवड्यामध्ये कंपनीतर्फे 'ग्लोबल एनव्हायर्मेंट वीक' या संकल्पनेवर आधारित एनर्जी एफिशियन्सी, कार्बन फूटप्रिंट रीडक्शन, ग्रीन साईटस् वेस्ट रीडक्शन, वॉटर कंजम्पशन रीडक्शन, तसेच वाहतूक पोलिसांसह दुचाकी व चार चाकी वाहनचालकांमध्ये जनजागृती करण्याचा प्रयत्न केला.

कंपनीच्या परिसरामध्ये झाडांचे रोप लावून वृक्षारोपण करण्यात आले. वेर्णा आणि नागोवा पंचायतीचे सरपंच सौ. लॉरेन्सा गामा, फ्रेंकी क्लीस यांच्या सहकार्याने प्लास्टिक कचरा गोळा करण्यात आला. लिला टेक्नॉलॉजीचे संचालक प्रदीप सरमोकादम यांचा 'पाणी वाचवा, जीवन वाचवा' हा पाण्याचे महत्त्व सांगणारा कार्यक्रम झाला. तसेच सर्पमित्र अमृत सिंह यांचा 'सर्पमित्र व पर्यावरणाचे रक्षण' यावर कार्यक्रम झाला.